# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

**(सकाळ)**

जा.क्र. १९०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०४/२०१८

**१) जुन्या वादावरून भांडण करून लोखंडी कुऱ्हाडीने डोक्यावर,अंगावर मारून जिवानीशी ठार केल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक ११/०४/२०१८ चे २०.३० वाजता ते २०.४५ वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीचे पती सोबत संडास बांधण्याचे जुन्या वादा वरून भांडण करून त्याला काठीने मारहान केली त्यावेळी फिर्यादीची सासु ही भांडण सोडविण्यास गेली असता, आरोपीने तिच्या उजव्या पायावर मारल्याने, व फिर्यादीचे पतीला तिच्या स्वत:चे घरासमोर नेवुन त्याचे घराचे गोठयातुन कोठुनतरी लहान दांडयाची लोंखडी कुऱ्हाड आणली व त्या कुऱ्हाडीने फिर्यादीचे मृतक पती दिलीप शिवा कोडापे वय ३५ वर्ष रा. जुना आंबागड यांचे डोक्यावर, मानेवर व अंगावर सपासप वार करून गंभिर जखमी करून त्यास जिवानाशी ठार मारल्याने, फिर्यादी सौ. ललीता दिलीप कोडापे वय ३० वर्ष रा. जुना आंबागड यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३०२ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. इंगळे पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) शिवीगाळ करून थापड–बुक्यांनी व काठीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक १२/०४/२०१८ चे १८.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादीची मुलगी ही तीचे घराचे शेजारी असलेल्या खातावर शेन फेकण्या करीता शेनाचा टोपला घेवुन जात असतांना यातील आरोपीने फिर्यादीचे मुलीला शिवीगाळ केली असता फिर्यादीचे मुलीने आरोपीस शिवीगाळ करून नकोस आपले घरी जा असे बोलले असता आरोपीने तिला थापड बुक्यांनी पाठीवर मारहान केली, तेव्हा फिर्यादी व फिर्यादीची पत्नी हे भांडण सोडविण्यास गेले असता, आरोपीने काठीने हातावर, डोक्यावर, व मांडीवर मारून जखमी केल्याने फिर्यादी नामदेव बाबुराव चांदेवार वय ५२ वर्ष रा. बांपेवाडा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२३,३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा लेंडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) संगनमत करून मारपीट करून अश्लिल हावभाव व अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक १३/०९/२०१७ चे १८.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी क्र. ३ हा त्याचे गुपचुपचा ठेला घरी घेवुन जात असतांना फिर्यादीची गाय ही घरासमोर सार्वजनिक रोडवर बांधले असता यातील आरोपी क्र. ३ ने गरोदर गायीला न सारता जोरात ठोस मारल्याने, गाय जमीनीवर पडली या वरून फिर्यादीचे पत्नीने आरोपीस हटकले असता, आरोपी क्र. १ व २ हे सुध्दा तेथे येवुन संगनमत करून फिर्यादी व फिर्यादीचे पत्नीला मारपीट करून जखमी केले व मारण्या–पिटण्याची धमकी दिली व आरोपी क्र १ ने फिर्यादीचे पत्नीला अश्लिल हावभाव करून, अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने फिर्यादीचे पत्नीचे मनात लज्जा निर्माण झाली अशा मा. जे.एम.एफ.सी कोर्ट पवनी यांचे जा.क्र. २६९/१८ दि. १२/०४/२०१८ अन्वये कलम १५६(३) जाफौ. चे आदेशान्वये पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२३,३२४,२९४,३५४,५०९,४२९,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**४) गळफास लावुन इसमाचा मृत्यु :–**

दिनांक १२/०४/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील मृतक सोमेश्वर लक्ष्मण कुकडे वय ३६ वर्ष रा. वाही याने त्याचेवर असलेल्या शेतीचे कर्जाला कंटाळुन घराचे धाब्यावर नॉयलॉन दोरीने स्वत: गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी रामचंद्र लक्ष्मण कुकडे वय ३० वर्ष रा. वाही यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुस्वार पोलीस स्टेशन पवनी करीत आहेत

**५) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १२/०४/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा सुमो तहसील टि पॉईट पवनी येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. ढाकणे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ढाकणे पोलीस स्टेशन पवनी करीत आहेत.

**६) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १२/०४/२०१८ चे २०.१० ते २१.१० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी–पीवळी वाहन जुना बसस्थनक तुमसर येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोउपनी. उबाळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाळे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**७) अवैध दारु अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक १२/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, गोबरवाही व लाखांदुर येथे अवैध हातभट्टी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३० लिटर हातभंट्टी दारू किंमती किमती २,२००/रु. चा माल जप्त करण्यात आला.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १२/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १११ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०४ तीन सिटर वाहनाकरीता– ०७ ईतर वाहनांवरती – १०० केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**महिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.